आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
सोमवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. होमगार्ड, कोतवाल, ग्राम रोजगार सेवकांना मानधन वाढ; विशेष शिक्षकांच्या पावणे ५ हजारांहून अधिक पदांची निर्मिती करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय.
2. कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २०२३ च्याखरीप हंगामासाठीच्या अनुदान वितरणास सुरुवात; पहिल्या टप्प्यात सुमारे 2399 कोटींचे होणार वाटप.
3. ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार जाहीर.
4. अमरावती आणि अकोला जिल्ह्यांत आज दुपारी भूकंपाचे सौम्य धक्के; ४ पूर्णांक २ दशांश रिश्टर स्केल इतक्या तीव्रतेची नोंद.

****

मंत्रिमंडळ निर्णय

आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत, राज्यातील गोशाळांना देशी वंशाच्या गायीसाठी परिपोषण योजनेमार्फत ‘प्रति गाय- प्रति दिन ५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती, राज्याचे पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. ही योजना कायमस्वरूपी असून, योजनेमुळे देशी गायींचे संगोपन आणि संवर्धन होऊन गोशाळांवरील आर्थिकभार कमी होईल, असा विश्वास विखे पाटील यांनी व्यक्त केला. त्याचप्रमाणे बंजारा समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी ‘बार्टी’च्या धर्तीवर “वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था” वनार्टी स्थापन करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत “वनार्टी” या स्वायत्त संस्थेच्या स्थापनेचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातले होमगार्ड, कोतवाल, ग्रामरोजगार सेवकांना मानधन वाढ, विशेष शिक्षकांच्या पावणे ५ हजारांहूनअधिक पदांची निर्मिती आणि निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या रकमेत वाढ करण्याचे निर्णय ,राज्य सरकारनं आज घेतले. कोतवालांना मानधनात१० टक्के वाढ आणि अनुकंपा धोरण राज्य सरकार लागू करणार आहे. ग्रामरोजगार सेवकांना आता ७ हजार रुपये मानधन आणि प्रोत्साहन अनुदान दिलं जाणार आहे.याशिवाय विशेष शिक्षकांच्या ४ हजार ८६० पदांची निर्मिती करायला मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. राज्य सरकारच्या सेवेतल्या कर्मचाऱ्यांसाठीचं सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उपदानाची मर्यादा वाढवून २० लाख होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंत्रीमंडळ बैठकीच्या

अध्यक्षस्थानी होते. मराठा आरक्षणासंदर्भात नेमलेल्या माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा आणि तिसरा अहवाल राज्य सरकारनं आज स्वीकारला. सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ आणि आर्य वैश्य समाजासाठी श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ स्थापन करायला मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे.

## खरीप हंगाम

राज्यातील कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना २०२३ च्या खरीप हंगामासाठीच्या अनुदान वितरणाचा शुभारंभ, आज राज्य मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आला.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,आणि अजित पवार यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने हे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले. कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पाच हजार रुपये प्रति हेक्टर असे दोन हेक्टर च्या मर्यादेत ,प्रत्येकी ५ हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय झालेला आहे. पहिल्या टप्प्यात ४९ लाख ५० हजार खातेदारांच्या खात्यांमध्ये २ हजार ३९८ कोटी ९३ लाख रुपये जमा करण्यात येत आहेत. राज्यात कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची संख्या सुमारे ९६ लाख ७८७ इतकी आहे.

## मेडिकल व्हॅल्यू ट्रॅव्हल समिट

भारताच्या चिकीत्सा पर्यटनाचा दृष्टीकोन केवळ शारीरिक चिकित्से पर्यंत मर्यादित नाही. त्यामध्ये मानसिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्याचाही समावेश आहे. आयुष पध्दती आणि पारंपरिक चिकीत्सा यांच्या संयोजनानं एक समग्र स्वास्थ्य सेवेचं मानक तयार होतं, जे भारताला विश्वव्यापी चिकित्सा पर्यटन क्षेत्रात विशेष स्थान देतं, असं प्रतिपादन ,केंद्रीय आयुष, आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. त्यांच्या हस्ते आज मुंबईत आयुष वैद्यकीय पर्यटन परिषदेचं उद्घाटन करण्यात आलं. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान आणि गोवा या राज्यांमधल्या वैद्यकीय, आयुर्वेदिक, आयुष रुग्णालये, पर्यटन स्थळं, प्रशिक्षण, कार्यशाळा इत्यादींची माहिती या परिषदेत देण्यात आली.

## किरण रिजिजू

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भगवान गौतम बुद्ध यांच्या महाराष्ट्रातील सर्व स्थळांना भेटी देऊन त्यांचा विकास करणार असल्याचं, केंद्रीय संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक मंत्री किरण रिजिजू यांनी आज सांगितल. किरण रिजिजू यांनी आज दादर

इथल्या चैत्यभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी तेथील भिख्खू संघास धम्म दान करून आशीर्वाद घेतले. पंचशीलाचा प्रतिक असलेल्या ३५८ या बोधचिन्हाच ही अनावरण रिजिजू यांच्या हस्ते करण्यात आलं.

उद्धव ठाकरे

उद्धव ठाकरेला फक्त जनताच संपवू शकते. हा लढा माझा, शरद पवार आणि महाविकास आघाडीचा नाही, तर महाराष्ट्रातील जनतेचा आहे असं प्रतिपादन उद्धव ठाकरे यांनी काल नागपूर इथं जाहीर सभेत केलं. जिल्ह्यातील कळमेश्वर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळयाचं अनावरण ठाकरे यांच्या हस्ते काल झालं . त्यावेळी आयोजित सभेत ते बाोलत होते. यावेळी खासदार संजय राऊत, भास्कर जाधव, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख, खासदार श्यामकुमार बर्वे आदी उपस्थित होते.आमचं हिंदुत्व हे साधूसंतांचं आहे. शिवाजी महाराजांचं हिंदुत्व आहे. आता शिवाजी महाराजांची ती जिद्द आपण घ्यायला पाहिजे असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

भंडारा सिल्क/मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल 'मन की बात' या मालिकेच्या ११४ व्या भागातून देशवासियांशी संवाद साधला. यावेळी भंडारा जिल्ह्यातील रेशीम उदयोग आणि त्यातून निर्माण झालेल्या रोजगार संधींचा मोदी यांनी आवर्जून उल्लेख केला.

*भंडारा जिल्ह्यात एक टसरच्या विशिष्ट प्रजाती जी इतरत्र कुठेही सापडत नाही. लोकल असं नाव आहे ही टसरची प्रजाती आहे. बाँपेवाडा, साकोलीच्या परिसरामध्ये इथे पूर्वी आढळल्याची ते मोठ्या प्रमाणावर त्याच्या धाग्याच उत्पादन केलं जात आणि ते प्रसिद्धी पण होत. या जिल्ह्यामध्ये सुमारे २५० लाभार्थी टसर कोश उत्पादनाच कार्य करतात मिष्टी, पवनी तालुका येथे तसेच देवरी येथे विभागीय फार्म आहेत. जिथं कीटक संगोपन कार्य केलं जात आणि भंडारा येथे अंडीकुंजी निर्मिती केली जाते. मागीलवर्षी अनुमानित जे रॉ सिल्क तयार झालेले आहे, जो धागा तयार झालेला आहे. तो ५५० किलोच्या आसपास आहे. या कार्यालयात मार्फत सुमारे ३०० लोकांना आणि धागाकरण, साडीनिर्मिती इत्यादी कार्यात महिला बचत गट आणि इतर सलंग्न पार्टीज आहेत त्यांना मिळून सुमारे २ हजार लोकांना प्रत्यक्ष या अप्रत्यक्ष लोकांना रोजगार मिळाला आहे.*

## मिथून चक्रवर्ती

केंद्र सरकारचा चित्रपट क्षेत्रातला प्रतिष्ठेचा दादासाहेब फाळके पुरस्कार यंदा ज्येष्ठ अभिनेते मिथून चक्रवर्ती यांना जाहिर झाला आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमांवरुन ही माहिती दिली. येत्या आठ ऑक्टोबरला ७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण समारंभात मिथून चक्रवर्ती यांना गौरवण्यात येणार आहे. आज वार्ताहरांशी बोलताना मंत्री वैष्णव यांनी मिथून चक्रवर्ती यांचं अभिनंदन केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमध्यमावरून मिथुन चक्रवर्ती यांचं अभिनंदन केलं आहे. दरम्यान, हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मी माझ्या कुटुंबाला आणि जगभरातल्या माझ्या चाहत्यांना समर्पित करत आहे, अशी प्रतिक्रिया मिथुन चक्रवर्ती यांनी दिली आहे.

## अमरावती भूंकम्प

नॅशनल सेंटर ऑफ सेस्मोलॉजीच्या संकेतस्थळावरुन प्राप्त माहीतीनुसार आज दुपारी 1 वाजून ३७ मिनिटांनी, अमरावती आणि अकोला जिल्ह्यांत भुकंपाचे सौम्य धक्के जाणवले. या भूकंपाचे केंद्र अमरावती जिल्हयातील चिखलदरा तालुक्यातील अमझरी आणि टेटु या गावांच्या मध्ये असुन रिश्टर स्केल वर याची नोंद, 4 पूर्णांक 2 इतकी आहे. याबाबत अकोटच्या तहसीलदारानीं सांगितलेल्या माहीतीनुसार मौजे रुधाडी, खिरकुंड ,प्रिंपी जैनपुर या गावामध्ये देखील सौम्य धक्के जाणवले. मात्र कुठल्याही जिवीत आणि वित्तहानीचे वृत्त नाही. याशिवाय तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड इथं देखील सौम्य धक्के जाणवले आहेत. अमरावती शहरासह धरणी आणि चिखलदरा या आदिवासी बहुल तालुक्यातील काही भागात सौम्य भूकंपाचे धक्के जाणवल्याने नागरिकांना सतर्क राहण्यास सांगण्यात आलं आहे.

## राज्यपाल

शासकीय विभागांमार्फत चंद्रपूर जिल्ह्यात राबविण्यात येणा-या विविध योजनांची माहिती नागरिकांना होण्याच्या दृष्टीने, उद्या एक ऑक्टोबर रोजी पोंभुर्णा इथं, राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत आदिवासी मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार राहतील. सदर कार्यक्रमात आदिवासी बांधवांकरीता योजनांचे वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे. तत्पूर्वी, राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचं आज सकाळी 10 वाजताच्या सुमारास भंडारा जिल्ह्यातील शहापूर येथील हेलीपॅडवर आगमन झालं. त्यांनतर त्यांनी शासकीय विश्राम गृह इथं अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. यात जिल्ह्यातील महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

<u>बाबा ताजुद्दीन सव्वीसावा शरीफ</u>

ताजाबाद शरीफ इथं हजरत बाबा ताजुद्दीन रहमतुल्ला अलैह यांचा सव्वीसावा शरीफ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. सव्वीसाव्या शरीफनिमित्त धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून आज सकाळी ९ वाजता ताजबाग ट्रस्टचे अधिकारी आणि सेवक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

******